# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
## ASSESSMENT I-2023-2024

**Grade - VIII** **Marks : 40**
**SUB:Marathi** **Time: 2Hrs**

---

**प्र.१.अ) खालील कवितेच्या ओळी वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(७)**

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.
भव्य पटांगण, बाग मनोहर
फुला-पाखरांचे जग सुंदर
आपुलकीचा सुवास पसरे
मनातून इथे निरंतर
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.
पायाभरणी अस्तित्वाची
प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई
इथे रुजवणूक त्या तत्वांची
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रंगारगांत
कलागुणांच्या क्षितिजावरती हो प्रतिभेची प्रभात,

**प्र.१ आकृती पूर्ण करा.** **(२)**

१) अमूल्य शिकवण (कोणाची) __________

२) पायाभरणी - (कशाची) ___________

**प्र.२ एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

१) कवीच्या मते व्यक्तित्वाच्या प्रयोग शाळेत कोणते गुण रुजतील?
२) कलागुणांच्या क्षितिजावर कशाची प्रभात होणार आहे?

**प्र.३ कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधून लिहा.** **(१)**

१) नभात २) अस्तित्वाची

**प्र.४. 'मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात' या ओळीचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.** **(२)**

**प्र.१.आ. खालील पाठीत गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(७)**

(सर्वजण मेंदूराजे यांच्याकडे जातात. त्यानंतर मेंदूराजे तातडीने सभा घेतात.)
सर्वजण: मेंदू राजे साहेबांचा जयजयकार असो!
मेंदूराजे: बसा मंडळी. पोटोबा प्रधान आले, की नाही अजून !
पोटोबा : मी केव्हाच हजर आहे महाराज.
मेंदू राजे: पोटोबा, या सर्व मंडळींची तुमच्याबद्दल तक्रार आहे, की तुम्ही अजिबात काम करत नाही. नुसतं खाता आणि दुसऱ्यांवर गुरगुरता.

पोटोबा: महाराज बोलताना जरा बेअदबी होतेय, कसूर माफ असावी; पण मी काम करत नाही हे म्हणणं साफ खोटं आहे. हो, अधूनमधून मी गुरगुरतो; पण ते यांच्यावर नव्हे. ती माझी सवय आहे. त्याशिवाय शरीराचे राज्य सुरळीत कसं चालणार? आता हेच उदाहरण घ्या ना. या सर्वांनी संप पुकारला मी गप्प बसलो; पण याचा परिणाम त्यांनाच भोगाव लागला. जीवन रस मिळाला नाही म्हणून त्यांचे चेहरे बघा. कसे सुकून गेलेत.

मेंदू राजे: नयन कुमार; पटलं ना सर्वांना. शिवाय असं पहा, आपण सारेच एकमेकांवर अवलंबून आहोत. आपल्या देशाचे राज्य सुरळीत कसं चालणार? आपल्या देशाचं राज्य ते सर्वांच्या एकतेमुळे. पाय चालतात ते रस्ता डोळ्यांनी दिसतो. म्हणून सर्वांची कामे होतात ती पोटोबामुळे. आपणाला जीवन रस मिळतो. म्हणून त्यांनी अन्न खाल्ले नाही तर काय हाल होतात. हे आता तुम्हाला समजलेच असेल आपण सारेच या शरीरुपे राज्याचे सेवक आहोत आपले हे राज्य सुरक्षित राहण्यासाठी आपण सर्वांनी एक व्हायला हवे खरे ना?

**प्र.१) एका शब्दात उत्तर लिहा.** **(१)**


१) यामुळे देशाचे राज्य सुरळीत चालते-_______

२) सर्वांनी पोटोबा ची तक्रार यांच्याकडे केली_______

प्र.२ पाय चालतात कारण_________________ (१)

प्र.३.______ मिळाला नाही म्हणून साऱ्यांचे चेहरे सुकले(रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.) (१)

प्र.४ आकृती पूर्ण करा. (२)




**प्र ५.'आपण सगळे शरीररुपी राज्याचे सेवक आहोत' या विधानाबाबत तुमचे मत लिहा.** **(२)**

**प्र.२.अ खालील अपठित गद्य वाचून प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.** **(६)**

आनंदवनमध्ये बाबांनी कुष्ठरोग्यांना स्वाभिमानाने जगायला शिकवले राहण्यासाठी झोपड्या बांधणे,अन्नधान्यासाठी शेती करणे यापासून अनेक पूरक उदयोग त्यांनी सुरूवात केले. अर्थात ही प्रक्रिया सोपी नव्हती. अनेक अडचणी होत्या. पण त्यावर मात करत बाबांनी भंगलेल्या शरीरांनी खचलेल्या मनांना जगण्याची उभारी दिली. ताठ मनाने जगण्याची प्रेरणा दिली. आनंदवनात वावांनी कुष्ठरोग्यांवर उपचार केले, त्यांना निवास उपलब्ध करून दिला. शिवाय त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी साधने उपलब्ध करून दिली त्यामुळे त्यांना कष्टाची भाकरी मिळवता आली. त्यांच्या कलागुणांना वाव दिला त्यामुळे देवाने मोडतोड केलेल्या चेहऱ्यांवर हास्य उमलले. हे हास्य समाधानानेच आत्मविश्वासाचे होते.

बोटं झडलेल्या थिया हातांना कामाची सवय लागावी आणि स्वाभिमानाचा ताठ कणा लाभावा यासाठी 'आनंदवनाची धडपड असते.

आनंदवन उभारताना बाबांनी अतोनात कष्ट घेतले. त्यामुळेच गेली दहा दशके तिथे महारोगाने, अंधत्वाने, अपंगत्वाने झाकोळून गेलेली जीवने उजळून निघाली. जन्माला येताना उपेक्षा घेऊन आलेल्या जीवामध्ये सुंदर मी होणार यासोबत 'सुंदर मी करणार' हा मंत्र आनंदवनाने जोपासला.

प्र१) अ.आनंदवनाने कोणता मंत्र जोपासला? (१)

आ. आनंदवनाची धडपड कशासाठी असते? (१)

२) एका शब्दात उत्तरे लिहा. (१)

१) बाबांनी कुष्ठरोग्यांना कसे जगायला शिकवले______

२) बाबांनी कशासाठी कष्ट घेतले_________

३) खालील समान अर्थाचा शब्द उताऱ्यातून शोधून लिहा.-‘मेहनत' (१)

४) वरील उताऱ्याच्या आधारे बाबांचे कार्य स्पष्ट करा. (२)

## विभाग ब

**प्र.३)सूचनेनुसार कृती करा.**

**अ.खालील अव्ययावरून अर्थपूर्ण वाक्य तयार करा (२)**

१) हळूच २) गावांसाठी

आ. अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा. (२)

१) **आपल्यातील** गुणदोष बघायला पाहिजे.

२) खूप मेहनत करा **आणि** यश प्राप्त करा.

इ. समानार्थी शब्द लिहा. (२)

१) खडक - २) पूजा –

ई. विरुद्धार्थी शब्द लिहा. (२)

१) प्रगती × २) सावली ×

क.लेखन नियमानुसार लिहा. (१)

१) जीवण २) प्रतीभा

ड. खालील वाक्प्रचाराचा अर्थ लिहा. (१)

१) पालन पोषण करणे

## विभाग क

**प्र.४)खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा. (६)**

१) तंत्रज्ञान, चांगले की वाईट २) माझे कुटुंब

ब. खालील चित्र पाहून चित्राचे योग्य शब्दात वर्णन करा. (४)

